# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(घ)(एक) [40(2)(d)(i)] नुसार या निवडणूक सूचनेस जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक अभ्यास मंडळातील सदस्यांमधून एका सदस्याची अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष पदासाठी निवडणूक**

## निवडणूक सूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(घ)(एक) [40(2)(d)(i)] नुसार वाणिज्य व व्यवस्थापन आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत समाविष्ट असलेल्या आणि या निवडणूक सूचनेस जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रत्येक अभ्यास मंडळांकरिता बुधवार, दि. ०७ जून, २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेल्या अभ्यास मंडळाच्या पहिल्या बैठकीत अभ्यास मंडळाच्या सदस्यांमधून एक सदस्य अध्यक्ष म्हणून निवडून देण्यासाठी दिनांक १७ मे, २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाने राजपत्राद्वारे प्रसिध्द केलेला सन २०१७ चा एकरुप परिनियम क्रमांक ०१ मधील मुद्दा क्रमांक ०९ (२) नुसार ही निवडणूक सूचना जारी करण्यात येत आहे.**

**१) परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या वाणिज्य व व्यवस्थापन आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेमध्ये समाविष्ट असलेल्या प्रत्येक अभ्यास मंडळांकरिता, अभ्यास मंडळाच्या पहिल्या बैठकीतील निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील. :**

| अ.क्र. | तपशील | वार, तारीख व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक, वार व वेळ | शनिवार, दि. २७ मे, २०२३ (वेळ : सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | निवडणूक विभाग, प्रशासन भवनासमोर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| २ | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक, वार व वेळ | सोमवार, दि. २९ मे, २०२३ (वेळ : सकाळी ११.०० वाजता) | निवडणूक विभाग, प्रशासन भवनासमोर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| ३ | नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासंबंधी लेखी कळविण्याचा दिनांक, वार व वेळ | बुधवार, दि. ३१ मे, २०२३ (वेळ : सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | निवडणूक विभाग, प्रशासन भवनासमोर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| ४ | निवडणुकीचा दिनांक, वार व कालावधी | बुधवार, दि. ०७ जून, २०२३ **(वेळ : परिशिष्ट-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे)** | संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| ५ | मतपत्रिकांची छाननी व मतमोजणीचा दिनांक, वार, वेळ व स्थळ | बुधवार, दि. ०७ जून, २०२३ (मतदानाची वेळ संपल्यानंतर लगेचच) | संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |

**(टिप : नमूद केलेल्या वेळेतच मतदान करता येईल.)**

२) नामनिर्देशन पत्र तसेच नामनिर्देशन मागे घेण्याचे अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना :

नामनिर्देशन पत्र तसेच नामनिर्देशन मागे घेण्याचे अर्ज विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावरील Nomination of Candidate -> Download Nomination Form या लिंकवर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करुन घेता येईल. नामनिर्देशन पत्र सादर करण्याच्या विहित वेळेपूर्वी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर अर्जाचे शुल्क रु. १०००/- (रुपये एक हजार फक्त) ऑनलाईन पध्दतीने भरता येईल. अर्जासोबत संबंधित कागदपत्रे व ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या शुल्काची पावती जोडून असे पत्र निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे विहित वेळेत जमा करावेत.

**टिप : ऐनवेळेला ऑनलाईन शुल्क भरताना व्यक्तिगत तांत्रिक समस्या उद्‌भवल्यास व त्यामुळे उमेदवाराला विहित वेळेत नामनिर्देशन पत्र भरता न आल्यास त्याला विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.**

**३) उमेदवारांसाठी आवश्यक पात्रता शर्ती व नामनिर्देशन पत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे :**

**संबंधित अभ्यास मंडळाच्या सदस्यांमधून निवडलेला –**

क) उमेदवार हा पीएच.डी. पदवीधारक असावा,
ख) एकूण किमान पंधरा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,
ग) पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करणारा मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असावा,
घ) मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शक असावा ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली असेल,
ङ) किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मूळ लेखक / अनुरुप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्स मध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावे,
च) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.

**नामनिर्देशन पत्रासोबत खालील कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित नामनिर्देशनपत्र 'अवैध' ठरविण्यात येईल.**

१. नामनिर्देशन शुल्क अदा केल्याची पावती.
२. पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र,
३. एकूण किमान पंधरा (१५) वर्षे अध्यापनाच्या अनुभवाचे विहित नमून्यातील प्रमाणपत्र
४. महाविद्यालय / परिसंस्थेतील अध्यापकांसाठी विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत / प्रती आणि विद्यापीठातील अध्यापकांसाठी विद्यापीठाचे नियुक्ती पत्र
५. पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याबाबतचे विद्यापीठाचे मान्यतापत्र,
६. पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत / प्रती
७. किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आलेली असेल अश्या विद्यार्थ्यांचे पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र,
८. किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असल्याबाबत किंवा मूळ लेखक / अनुरुप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्स मध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिध्द केलेले असल्याबाबतची संबंधित कागदपत्रे,
९. विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाचे एकूण किमान पाच वर्षे अनुभवाचे विहित नमून्यातील प्रमाणपत्र.
१०. नावात बदल असल्यास शासन राजपत्र किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र.
११. हमीपत्र – (पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याबाबतचे) **(परिशिष्ट-३)**

४) योग्यरितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी सर्व आवश्यक कागदपत्रांसह दाखल केलेली नामनिर्देशन पत्र / पत्रे विचारात घेतले / घेतली जातील.

५) नामनिर्देशनपत्रांवर, मत देण्यासाठी हक्कदार असलेल्या दोन संबंधित अभ्यास मंडळाच्या सदस्यांकडून दिनांक लिहून स्वाक्षरी करण्यात येईल आणि त्यामध्ये, दिनांक, नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची पूर्ण नावे, पत्ते यांचा समावेश असेल. कोणत्याही व्यक्तीला, त्याने नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करुन व दिनांक लिहून त्याची संमती दिल्याखेरीज निवडणुकीतील उमेदवार म्हणून नामनिर्देशित केले जाणार नाही. कोणतीही व्यक्ती, त्याच्या स्वतःच्या नामनिर्देशनामध्ये एकतर सूचक किंवा अनुमोदक असणार नाही. परंतु, जेथे तीनपेक्षा कमी मतदार असतील तेथे उमेदवार, त्याच्या नामनिर्देशनामध्ये स्वतः सूचक व अनुमोदक असू शकेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(३))

६) एकरुप परिनियम क्र. १ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटींचे अनुपालन करीत नसलेले नामनिर्देशनपत्र अवैध असेल आणि ते फेटाळले जाईल.

७) उमेदवारास निवडणुकीतून माघार घेण्याचा पर्याय खुला असेल : परंतु, अशा उमेदवारास निवडणुकीच्या वेळापत्रकात विहित केलेल्या दिनांकास सायंकाळी ५ वाजण्यापूर्वी विद्यापीठाच्या कार्यालयात व्यक्तिशः किंवा त्याने लिखित स्वरुपात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत त्याने स्वाक्षरी केलेला नामनिर्देशन मागे घेतल्याचा अर्ज सादर करावा लागेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(५))

८) जर वैध नामनिर्देशनांची संख्या भरावयाच्या रिक्त पदांच्या संख्येपेक्षा अधिक नसेल तर, निवडणुकीचा निकाल जाहीर करण्याच्या दिनांकास नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांना निवडून आले असल्याचे घोषित करण्यात येईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(८))

९) नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१०) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २८ एप्रिल, २०१७ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचेच नामनिर्देशन पत्र ग्राह्य धरण्यात येतील. शासन राजपत्र, शासनाने यासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर Act/Statutes व Notifications/ Circulars या लिंकवर उपलब्ध आहे.

११) नामनिर्देशन पत्र छानननी आणि मतमोजणीच्यावेळी स्वतः उमेदवार किंवा त्याने लेखी पत्राव्दारे प्राधिकृत केलेली अभ्यास मंडळ सदस्यांच्या यादीतील मतदार असलेली अधिकृत व्यक्ती प्रतिनिधी म्हणून एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल.

१२) **बुधवार, दिनांक ०७ जून, २०२३ रोजी संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे होणा-या अभ्यास मंडळाच्या पहिल्या बैठकीत संबंधित मतदारांनी ('परिशिष्ट २' मध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार) मतदान करावयाचे आहे. तथापि, अभ्यास मंडळ सदस्य म्हणून मतदानाच्या अंतिम दिनांकापर्यंत रिक्त असलेल्या जागेवर मा. अभ्यास मंडळ सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेल्या व्यक्तीस सदर सभेमध्ये मतदार म्हणून मतदानाचा आपला हक्क बजावता येईल.**

१३) मतदानास येताना मतदारांनी स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र उदा. शासकीय / निमशासकीय सेवकांचे कार्यालयीन ओळखपत्र, आधारकार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले फोटोसहित ओळखपत्र किंवा आयकर अधिका-यांनी (Income Tax) दिलेले फोटोसहित ओळखपत्र (PAN Card) किंवा विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र किंवा तत्सम फोटोसहित ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. **संबंधित सभासदास / सदस्यास / मतदारास ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतपत्रिका मिळणार नाही.**

**१४)** ही निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधित्व पध्दतीनुसार एकल संक्रमणीय मताद्वारे व परिनियमांव्दारे विहित केल्याप्रमाणे मतपत्रिकांद्वारे घेण्यात येईल. या निवडणुकीसाठी मतदान हे पसंतीनुसार प्राधान्यक्रम या पध्दतीने करावयाचे आहे.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ क्र. साफुपुविनि/४०(२)(घ)(एक) /२११ )
दिनांक : १३/०५/२०२३ )

( डॉ. प्रफुल्ल पवार )
**कुलसचिव**

निवडणूक सूचना जा. क्र. - साफुपुविनि / ४०(२)(घ)(एक) /२११, दिनांक १३/०५/२०२३ चे परिशिष्ट – १

# LIST OF BOARD OF STUDIES

| FACULTY – COMMERCE & MANAGEMENT | |
|---|---|
| 1. | Business Practices |
| 2. | Business Laws |
| 3. | Business Economics |
| 4. | Statistics and Computer Applications |
| 5. | Banking, Finance and Insurance |
| 6. | Accountancy |
| 7. | Cost and Works Accounting |
| 8. | Marketing |
| 9. | Business Administration |
| 10. | Human Resource Management |
| 11. | Financial Management |
| 12. | Production and Operations Management |
| 13. | Marketing Management |
| 14. | Computer Management |
| 15. | Organization Management |
| 16. | International Business Management |
| 17. | Hospital and Healthcare Management |
| 18. | Hotel Management |

| FACULTY – SCIENCE & TECHNOLOGY | |
|---|---|
| 1. | Pharmaceutics |
| 2. | Pharmaceutical Chemistry |
| 3. | Pharmacognosy |
| 4. | Pharmacology |

(Dr. Prafulla Pawar)
Registrar

# Election Schedule of Board of Studies

## FACULTY – COMMERCE & MANAGEMENT

## Date : 07/06/2023

| GROUP E | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Name of BOS** | **Day & Date** | **Election Time** | **Counting** |
| 1 | Business Practices | Wednesday, 07/06/2023 | 10.30 a.m. to 10.45 a.m. | After Election |
| 2 | Business Laws | | | |
| 3 | Business Economics | | | |
| 4 | Statistics and Computer Applications | | | |
| 5 | Banking, Finance and Insurance | | | |
| 6 | Accountancy | | | |

| GROUP F | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Name of BOS** | **Day & Date** | **Election Time** | **Counting** |
| 1 | Cost and Works Accounting | Wednesday, 07/06/2023 | 12.15 p.m. to 12.30 p.m. | After Election |
| 2 | Marketing | | | |
| 3 | Business Administration | | | |
| 4 | Human Resource Management | | | |
| 5 | Financial Management | | | |
| 6 | Production and Operations Management | | | |

(Dr. Prafulla Pawar)
Registrar

निवडणूक सूचना जा. क्र. - साफुपुविनि / ४०(२)(घ)(एक) /२११, दिनांक १३/०५/२०२३ चे परिशिष्ट – २

# Election Schedule of Board of Studies

## FACULTY – COMMERCE & MANAGEMENT

**Date : 07/06/2023**

| GROUP G | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Name of BOS** | **Day & Date** | **Election Time** | **Counting** |
| 1 | Marketing Management | Wednesday, 07/06/2023 | 2.15 p.m. to 2.30 p.m. | After Election |
| 2 | Computer Management | | | |
| 3 | Organization Management | | | |
| 4 | International Business Management | | | |
| 5 | Hospital and Healthcare Management | | | |
| 6 | Hotel Management | | | |

## FACULTY – SCIENCE & TECHNOLOGY

| GROUP H | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Name of BOS** | **Day & Date** | **Election Time** | **Counting** |
| 1 | Pharmaceutics | Wednesday, 07/06/2023 | 4.15 p.m. to 4.30 p.m. | After Election |
| 2 | Pharmaceutical Chemistry | | | |
| 3 | Pharmacognosy | | | |
| 4 | Pharmacology | | | |

(Dr. Prafulla Pawar)
Registrar

निवडणूक सूचना जा. क्र. - साफुपुविनि / ४०(२)(घ)(एक) /२११, दिनांक १३/०५/२०२३ चे परिशिष्ट - ३

**महाविद्यालयीन प्राचार्य / परिसंस्थातील संचालक यांचेकरिता**

## हमीपत्र

**(पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याबाबतचे)**

मी श्री./श्रीमती/डॉ. ......................................पीएच.डी. पदवी धारक असून ........................................................ या संलग्न महाविद्यालयात / मान्यताप्राप्त परिसंस्थेत पूर्णवेळ ............................. या विषयाचा अध्यापक असून विद्यापीठाचे पत्र क्र. .................... दिनांक ....................... अन्वये उक्त नमूद महाविद्यालयामध्ये मला पूर्णवेळ पदव्युत्तर अध्यापक या पदाकरीता मान्यता मिळालेली आहे.

सदर महाविद्यालयामध्ये मला दिनांक ...................... ते दिनांक ........................ पर्यंत ................................ या विषयाकरीता पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याचा एकूण ......... वर्षे अनुभव आहे.

सदरचे हमीपत्र हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(घ)(एक) नुसार .............................................................या विद्याशाखेमध्ये समाविष्ट असलेल्या ..................................... या अभ्यास मंडळावरील निवडणुकीच्या कामी मी देत आहे.

वरील माहिती खरी व अचूक आहे. सदरची माहिती खोटी आढळून आल्यास नियमानुसार होणा-या पुढील कारवाईस मी जबाबदार राहील.

**प्राचार्य / संचालक यांची स्वाक्षरी :**
**प्राचार्य / संचालक यांचे नाव :**

असे प्रमाणित करण्यात येते की, या शैक्षणिक संस्थेकडे उपलब्ध असलेल्या निवडणूकीसंदर्भातील कागदपत्रांवरुन श्री./श्रीमती/डॉ. ..................................................... यांनी उपरोक्त नमुद केलेला तपशील अचूक आहे.

**अध्यक्ष/सचिव यांची स्वाक्षरी : ..................**

**अध्यक्ष/सचिव यांचे नाव : ..................**

**संस्थेचा शिक्का : ..................**

ठिकाण :

दिनांक :

निवडणूक सूचना जा. क्र. - साफुपुविनि / ४०(२)(घ)(एक) /२११, दिनांक १३/०५/२०२३ चे परिशिष्ट - ३

**<u>महाविद्यालयीन / परिसंस्थेतील अध्यापक यांचेकरिता</u>**

# <u>हमीपत्र</u>

**(पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याबाबतचे)**

मी श्री./श्रीमती/डॉ. ......................................पीएच.डी. पदवी धारक असून ....................................................... या संलग्न महाविद्यालयात / मान्यताप्राप्त परिसंस्थेत पूर्णवेळ ............................. या विषयाचा अध्यापक असून विद्यापीठाचे पत्र क्र. ................... दिनांक ....................... अन्वये उक्त नमूद महाविद्यालयामध्ये मला पूर्णवेळ पदव्युत्तर अध्यापक या पदाकरीता मान्यता मिळालेली आहे.

सदर महाविद्यालयामध्ये मला दिनांक ...................... ते दिनांक ........................ पर्यंत ................................ या विषयाकरीता पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याचा एकूण ......... वर्षे अनुभव आहे.

सदरचे हमीपत्र हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(घ)(एक) नुसार ...........................................................या विद्याशाखेमध्ये समाविष्ट असलेल्या ................................... या अभ्यास मंडळावरील निवडणुकीच्या कामी मी देत आहे.

वरील माहिती खरी व अचूक आहे. सदरची माहिती खोटी आढळून आल्यास नियमानुसार होणा-या पुढील कारवाईस मी जबाबदार राहील.

**अध्यापकाची स्वाक्षरी :**
**अध्यापकाचे नाव :**

असे प्रमाणित करण्यात येते की, या शैक्षणिक संस्थेकडे उपलब्ध असलेल्या निवडणूकीसंदर्भातील कागदपत्रांवरुन श्री./श्रीमती/डॉ. .................................................... यांनी उपरोक्त नमुद केलेला तपशील अचूक आहे.

**प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी** : ..................

**प्राचार्य/संचालकांचे नाव** : ..................

**महाविद्यालय/परिसंस्थेचा शिक्का** : ..................

ठिकाण :

दिनांक :